ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज™
WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 22 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## सौदी अरेबियात 'अश्लील कृत्या'प्रकरणी बांगलादेशी तरुणाला मृत्युदंड





पान 3 वरुन...
विजयासाठी प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचा!

### महाराष्ट्राचा वैविध्यपूर्ण वारसा दर्शवणारी एक विशेष भेटवस्तू प्रदान

# कुंभमेळा ध्वजारोहणासाठी राष्ट्रपतींना खास निमंत्रण

नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा



**महाईन्यूज** । नाशिक

**नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला वेग आला असून, ध्वजारोहण सोहळ्यासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निमंत्रित करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने बुधवारी राष्ट्रपती भवनात त्यांची भेट घेऊन अधिकृत निमंत्रण दिले.**

या भेटीदरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील ध्वजारोहण सोहळ्यांना उपस्थित राहण्याची विनंती राष्ट्रपतींना केली. यावेळी महाराष्ट्राचा वैविध्यपूर्ण सांस्कृतिक वारसा दर्शविणारी विशेष भेटवस्तूही त्यांना देण्यात आली. यामध्ये राज्याच्या आध्यात्मिक परंपरा, आदिवासी उद्योजकता, वस्त्रकला, कृषी समृद्धी आणि खाद्यसंस्कृतीचे दर्शन घडविण्यात आले.

येत्या ३१ ऑक्टोबर रोजी गोदावरी आरतीसह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या संकेतस्थळाचे लोकार्पण, कुंभमेळ्याच्या गीताचे प्रकाशन, कुंभमेळ्यावर आधारित कॉफी टेबल पुस्तकाचे प्रकाशन आणि विशेष टपाल तिकिटाचे अनावरण अशा कार्यक्रमांसाठीही राष्ट्रपती मुर्मू यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

या शिष्टमंडळात निवडक मंत्री, पुरोहित संघटना आणि धार्मिक संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. तसेच सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम आणि कुंभमेळा आयुक्त शेखर सिंग यांचाही समावेश होता.

राष्ट्रपतींना देण्यात आलेले निमंत्रण विशेष कलात्मक पॉप-अप रचनेत तयार करण्यात आले आहे. त्यातून सिंहस्थ कुंभमेळ्याची पौराणिक उत्पत्ती, आध्यात्मिक महत्त्व आणि भव्यता अधोरेखित करण्यात आली आहे. निमंत्रणाच्या रचनेत दृष्टी, ध्वनी, गंध, चव आणि स्पर्श या पाचही ज्ञानेंद्रियांचा अनुभव लक्षात घेण्यात आला आहे.

नाशिकचा सांस्कृतिक वारसा, गोदावरी नदीचे महत्त्व आणि भारतीय परंपरेतील कुंभमेळ्याचे स्थान यांचे प्रतीकात्मक दर्शन या निमंत्रणातून घडविण्यात आले आहे. सिंहस्थ कुंभमेळा हा धार्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचा सोहळा मानला जातो. या पार्श्वभूमीवर राष्ट्रपतींना देण्यात आलेल्या निमंत्रणामुळे आगामी कुंभमेळ्याच्या तयारीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

### ३१ ऑक्टोबरला विविध कार्यक्रमांचे आयोजन

नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ३१ ऑक्टोबर रोजी गोदावरी आरती, कुंभमेळा प्राधिकरणाच्या संकेतस्थळाचे लोकार्पण, कुंभमेळा गीताचे प्रकाशन, कॉफी टेबल पुस्तकाचे प्रकाशन आणि विशेष टपाल तिकिटाचे अनावरण असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमांसाठीही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

### वैशिष्ट्यपूर्ण निमंत्रण पत्रिका

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना देण्यात आलेली निमंत्रण पत्रिका कलात्मक पॉप-अप रचनेत तयार करण्यात आली आहे. यात कुंभमेळ्याची पौराणिक उत्पत्ती, आध्यात्मिक महत्त्व आणि नाशिकचा सांस्कृतिक वारसा अधोरेखित करण्यात आला आहे. दृष्टी, ध्वनी, गंध, चव आणि स्पर्श या पाच ज्ञानेंद्रियांशी संबंधित संकल्पनांचा समावेश करून कुंभमेळ्याचा अनुभवात्मक परिचय देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

# पुण्यात पुन्हा ७५ किमीचे सायकल ट्रॅक!

## पुणे ग्रँड टूर २०२७ च्या पार्श्वभूमीवर हालचाली; सायकलस्वारांना सुरक्षित मार्ग देण्यावर भर

**महाईन्यूज । पुणे**

**एकेकाळी 'सायकलींचे शहर' अशी ओळख असलेल्या पुणे शहरात सायकलस्वारांसाठी सुरक्षित मार्ग निर्माण करण्याच्या उद्देशाने कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेले सायकल ट्रॅक उभारण्यात आले होते. मात्र या सायकल ट्रॅकची दुरावस्था झाली आहे. त्यामुळे हे सायकल ट्रॅक पुन्हा विकसित करण्याचा विचार महापालिकेने सुरू केला आहे.**




शहरात सुरुवातीला ७५ किलोमीटरचे सलग आणि सुरक्षित सायकल मार्ग उभारण्याचे नियोजन करण्यात आले असून, पुढील टप्प्यात हे जाळे सुमारे १३६ किलोमीटरपर्यंत विस्तारण्याचा विचार आहे. त्यामुळे जुन्या चुका सुधारून नव्याने उभारलेले ट्रॅक टिकवण्याचे मोठे आव्हान महापालिकेसमोर असणार आहे. यापूर्वी कोट्यावधी रुपये खर्च करून पुणे महापालिकेने हे ट्रॅक उभारले होते. रस्त्यांवर होणारी अतिक्रमणे, बेशिस्त वाहतूक, देखभालीचा अभाव आणि रस्ते-पदपथांच्या रुंदीकरणात झालेली मोडतोड यामुळे अनेक सायकल ट्रॅक नामशेष झाले आहेत.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी याबाबत नुकतीच बैठक घेतली. शहरातील सायकल मार्गांची सद्यस्थिती तपासून अपूर्ण जोडणी पूर्ण करण्याचे आणि त्रुटी दूर करण्याचे आदेश पथ विभागाला दिले आहेत. नुकतीच महापालिकेत बैठक झाली. या बैठकीत इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सपोर्टेशन अँड डेव्हलपमेंट पॉलिसी (आयटीडीपी) या संस्थेच्या वतीने प्रस्तावित ७५ किलोमीटरच्या सायकल मार्गांबाबत सादरीकरण करण्यात आले. यामध्ये सध्याच्या मार्गांमधील तुटक जोडणी, पायाभूत सुविधांची कमतरता आणि सायकलस्वारांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा झाली.

शहरातील वाहतूक कोंडी कमी करणे, खासगी वाहनांवरील अवलंबित्व घटवणे आणि पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी २०१६-१७ च्या सुमारास सायकल मार्गांचे नियोजन करण्यात आले होते. 'पुणे सायकल प्लॅन' आणि 'सर्वसमावेशक सायकल मास्टर प्लॅन'लाही मंजुरी देण्यात आली होती. त्यानंतर विविध रस्त्यांवर सायकल ट्रॅक उभारण्यात आले. मात्र, हे मार्ग एकमेकांना जोडण्यात प्रशासनाला यश आले नाही.

शहरात अनेक ठिकाणी सायकल ट्रॅकवर वाहनांचे पार्किंग, फेरीवाल्यांचे अतिक्रमण आणि अन्य अडथळे निर्माण झाले. काही ठिकाणी रस्ते रुंदीकरणात ट्रॅक तोडण्यात आले, तर पदपथांच्या कामांमुळे त्यांचे अस्तित्वच पुसले गेले. परिणामी, स्वतंत्र सायकल मार्ग असूनही सायकलस्वारांना जीव मुठीत धरून मुख्य रस्त्यावरून प्रवास करावा लागत आहे.

### ग्रँड टूरसाठीच की पुणेकरांसाठीही?

पुणे ग्रँड टूर २०२७ च्या पार्श्वभूमीवर शहरातील रस्ते आणि सायकल मार्गांच्या विकासाला गती देण्याचे नियोजन आहे. आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धांच्या आयोजनाची तयारी होत असताना पुणेकरांना मात्र दैनंदिन प्रवासासाठी सुरक्षित आणि सलग सायकल मार्ग मिळालेले नाहीत. त्यामुळे स्पर्धेपुरते देखावे न उभारता सायकल ट्रॅकची नियमित देखभाल, अतिक्रमणांवर कारवाई, वाहनांचे पार्किंग रोखणे आणि मार्गांची सलग जोडणी यांना प्राधान्य द्यावे लागणार आहे.

### गणेशखिंड रस्त्यावर दोन्ही बाजूंना ट्रॅक?

गणेशखिंड रस्त्यावर दोन्ही बाजूंना सायकल ट्रॅक विकसित करण्याचा विचार सुरू आहे. यापूर्वी या रस्त्याच्या एका बाजूला सायकल मार्ग तयार करण्यात आला होता. आता पीएमआरडीए आणि टाटा यांच्या प्रकल्पांशी समन्वय साधून सायकल मार्गासह अन्य विकासकामे करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. मात्र, या प्रस्तावाचा अंतिम निर्णय, खर्च आणि कामाची कालमर्यादा अद्याप निश्चित झालेली नाही.

# म्हाडा पुणे मंडळाच्या ४४६२ घरांच्या सोडतीला तुफान प्रतिसाद

**महाईन्यूज । पुणे**

**म्हाडाच्या पुणे मंडळाच्या ४४६२ घरांच्या सोडतीत तांत्रिक अडचणी येत असल्याने अर्जदार हैराण झाले असून मंडळाला सातत्याने मुदतवाढ देण्याची नामुष्की ओढवत आहे. मात्र दुसरीकडे या सोडतीला अर्जदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याचेही चित्र आहे. कारण ४४६२ घरांसाठी मंडळाकडे आतापर्यंत दोन लाख ११ हजार ४१४ अर्ज सादर झाले असून यातील एक लाख ४१ हजार ४१७ अर्जदारांनी अनामत रक्कमेसह म्हाडाकडे अर्ज सादर केले आहेत. दरम्यान, नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृतीला आता ३० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे अंतिम मुदतीपर्यंत अनामत रक्कमेसह अर्ज सादर करणाऱ्यांची संख्या दोन लाखांपर्यंत जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.**



पुणे मंडळाला १५ टक्के एकात्मिक योजना आणि २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या ४४६२ घरांसाठी २४ ऑगस्टपासून नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रिया सुरू आहे. मात्र, या प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी लक्षात घेता मंडळाने या प्रक्रियेस दोनदा मुदतवाढ दिली. तर आता १६ ते २० ऑक्टोबरदरम्यान महाआयटी प्रणाली काही कारणाने बंद असल्याने अर्जदारांच्या कागदपत्रांची पडताळणी रखडली आहे. त्यामुळे मंगळवारी (२० ऑक्टोबर) पुणे मंडळाने सोडतपूर्व प्रक्रियेस पुन्हा, तिसऱ्यांदा मुदतवाढ दिली. त्यानुसार आता ३० ऑक्टोबरपर्यंत अर्जदारांना अर्ज सादर करता येणार असल्याची माहिती मंडळाचे मुख्य अधिकारी राहुल साकोरे यांनी दिली.

या मुदतवाढीनुसार नवीन, सुधारित वेळापत्रकही लवकरच जाहीर केले जाईल, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, तांत्रिक अडचणींमुळे अर्जदार हैराण झाले असले तरी दुसरीकडे मात्र या सोडतीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. या सोडतीसाठी मंगळवारपर्यंत (२० ऑक्टोबर) दोन लाख ११ हजार ४१४ अर्ज सादर झाले असून यातील एक लाख ४१ हजार ४१७ अर्जदारांनी अनामत रक्कमेसह म्हाडाकडे अर्ज सादर केले आहेत.

सोडतपूर्व प्रक्रियेस आता आठवड्याभराची मुदतवाढ दिल्याने अनामत रक्कमेसह प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या संख्येत आणखी वाढ होणार आहे. त्यामुळे अर्जांची संख्या दोन लाखांपर्यंत जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अनामत रक्कमेसह सादर झालेले पात्र अर्जदारच सोडतीत सहभागी होतात. त्यामुळे सोडतीत किमान दोन लाख अर्जदार सहभागी होतील, अशीही शक्यता आहे. प्राप्त अर्जांची अंतिम यादी जाहीर झाल्यानंतर किती अर्जदार सहभागी होणार, हे स्पष्ट होईल.

### ४ डिसेंबरची सोडत आता लांबणीवर

सोडतीच्या मूळ वेळापत्रकानुसार १३ ऑक्टोबरला सोडत काढली जाणार होती. मात्र, सोडतीस वारंवार मुदतवाढ देण्यात आल्याने १३ ऑक्टोबरची सोडत आता थेट ४ डिसेंबरवर गेली होती. तर आता तिसऱ्या मुदतवाढीमुळे सोडत १० डिसेंबरनंतर होणार आहे. सोडतीची तारीख अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही. ही तारीख गुरुवारपर्यंत जाहीर केली जाण्याची शक्यता आहे.

# विजयासाठी प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचा!

## मंडलनिहाय नियोजन; पदवीधर, शिक्षक निवडणुकीसाठी महेश लांडगे यांचे आवाहन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत पक्षाच्या अधिकृत उमेदवारांना विजयी करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने जबाबदारीने आणि एकजुटीने काम करावे. संघटनात्मक समन्वय मजबूत करत प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करावेत, असे आवाहन आमदार महेश लांडगे यांनी केले.**




पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर भोसरी विधानसभा मतदारसंघाच्या वतीने आयोजित आढावा बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. बैठकीला सर्व नगरसेवक, मंडल अध्यक्ष, प्रभारी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सहकारी उपस्थित होते. यावेळी निवडणुकीची पूर्वतयारी, प्रचार यंत्रणेचे नियोजन, मतदार संपर्क आणि संघटनात्मक समन्वयाचा आढावा घेण्यात आला.

पुणे पदवीधर मतदारसंघाच्या अधिकृत उमेदवार डॉ. स्मिता योगेश जाधव आणि पुणे शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार कौस्तुभ मुरलीधर गावडे यांना पहिल्या पसंतीचे मत देऊन विजयी करण्यासाठी संपर्क अभियानाला गती देण्याचे आवाहन लांडगे यांनी केले. प्रत्येक मंडलातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आपापल्या जबाबदाऱ्यांचे नियोजन करून मतदारांशी थेट संवाद साधावा, यावर त्यांनी भर दिला.

मतदार संपर्काचे काम प्रभावी होण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये सातत्यपूर्ण समन्वय आवश्यक आहे. प्रत्येक मतदारापर्यंत उमेदवारांची माहिती आणि पक्षाची भूमिका पोहोचवताना संपर्कातील कोणतीही उणीव राहणार नाही, याची काळजी घ्यावी. स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांचे जाळे अधिक सक्रिय करून प्रचाराला गती द्यावी, अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या.

### २३ ऑक्टोबर रोजी मतदान

दिलेल्या माहितीनुसार, पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. पात्र मतदारांनी मतदानात सहभाग घेऊन पक्षाच्या अधिकृत उमेदवारांना पहिल्या पसंतीचे मत द्यावे, असे आवाहन बैठकीत करण्यात आले. पदवीधर आणि शिक्षक मतदारांचे प्रश्न समजून घेऊन त्यांच्याशी संवाद साधण्याला प्राधान्य द्यावे. प्रत्येक कार्यकर्त्याने निवडणुकीतील आपली जबाबदारी गांभीर्याने पार पाडल्यास संघटनेची ताकद मतदानातून दिसून येईल, असा विश्वास लांडगे यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनानुसार पुण्यासह पाचही जागांवर विजय मिळवण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकदिलाने प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यकर्त्यांची ऊर्जा, संघटनेची बांधिलकी आणि विजयाचा संकल्प यांच्या बळावर निवडणुकीला सामोरे जाण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला.

> “संघटनात्मक एकजूट हीच भाजपाची ताकद आहे. प्रत्येक मंडलाने जबाबदाऱ्यांचे स्पष्ट नियोजन करून प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचावे. पदवीधर आणि शिक्षक मतदारांशी थेट संवाद साधत त्यांच्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे. डॉ. स्मिता योगेश जाधव आणि कौत्सुभ मुरलीधर गावडे यांच्या विजयासाठी सर्वांनी एकदिलाने काम सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली संघटित प्रयत्नांच्या बळावर विजयाचा संकल्प पूर्ण होईल, असा विश्वास आहे.”
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

---

# नाले बुजविले, शहर जलकोंडीत; आता महापालिकेचा कारवाईचा बडगा!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील नैसर्गिक नाल्यांवर झालेल्या अतिक्रमणांमुळे पावसाळ्यात जलकोंडीची समस्या गंभीर बनत आहे. महापालिकेच्या सर्वेक्षणात ३६५ नाल्यांच्या ठिकाणी अतिक्रमणे आणि पाण्याच्या प्रवाहातील अडथळे आढळले आहेत. त्यापैकी ९३ नाले बुजविण्यात किंवा वळविण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर पहिल्या टप्प्यात ६७ नाल्यांवरील अतिक्रमणे हटविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार असून, निधी उपलब्ध झाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.**




महापालिकेच्या जलनिस्सारण व स्थापत्य विभागाने केलेल्या सर्वेक्षणात अनेक ठिकाणी नैसर्गिक नाल्यांवर बांधकामे, रस्ते आणि वाहनतळ उभारल्याचे आढळले. काही ठिकाणी अरुंद भूमिगत पाइप टाकून नाल्यांचा प्रवाह मर्यादित करण्यात आला आहे. त्यामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्यास अडथळे निर्माण होऊन रस्ते, गृहसंकुले आणि सखल भागांत पाणी साचत आहे. या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी क्षेत्रीय अधिकारी, कार्यकारी अभियंते आणि स्थापत्य अभियांत्रिकी सहायकांकडून नाल्यांची माहिती संकलित करण्यात आली. त्यानुसार पहिल्या टप्प्यात ६७ नाल्यांवरील अतिक्रमणे हटविण्यात येणार असून, त्यानंतर उपलब्ध निधी आणि प्राधान्यक्रमानुसार उर्वरित ठिकाणी कारवाई केली जाणार आहे.

शहर अभियंता विभागाने पहिल्या टप्प्यातील ६७ नाल्यांसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला आहे. सध्या अस्तित्वात असलेले अरुंद पाइप काढून त्याऐवजी अधिक क्षमतेचे ‘बॉक्स कल्व्हर्ट’ उभारण्याचा प्रस्ताव आहे. यामुळे पावसाचे पाणी वाहून नेण्याची क्षमता वाढण्यास मदत होणार आहे. मात्र, प्रत्यक्ष काम सुरू करण्यासाठी आयुक्तांची मंजुरी, निधीची उपलब्धता आणि निविदा प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे.

महापालिकेच्या जलनिस्सारण विभागाचे सहशहर अभियंता विनय ओहोळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, डीपीआरमध्ये नाल्यांची सद्य:स्थिती, अतिक्रमणांचे स्वरूप, प्रस्तावित कामांचा खर्च आणि तांत्रिक बाबींचा समावेश करण्यात आला आहे. मंजुरी आणि निधी उपलब्ध झाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबवून काम सुरू केले जाईल.

पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार झपाट्याने होत असताना अनेक नैसर्गिक नाल्यांचे मार्ग बदलले गेले आहेत. काही नाले अरुंद झाले, तर काही ठिकाणी ते पूर्णपणे बुजविण्यात आले. पवना, मुळा आणि इंद्रायणी नद्यांच्या परिसरात वसलेल्या शहरातील पावसाचे पाणी नैसर्गिक प्रवाहांमार्फत नद्यांपर्यंत पोहोचते. मात्र, वाढत्या गृहप्रकल्पांमुळे नाल्यांच्या जागांवर बांधकामे झाल्याने पाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था बाधित झाली आहे. परिणामी, मुसळधार पावसात रस्ते आणि सखल वस्त्यांमध्ये पाणी साचण्याचे प्रकार घडतात.

नाल्यांवरील अतिक्रमणे हटविण्याबरोबरच त्यांचा मूळ प्रवाह पुनर्स्थापित करणे आणि पाणी वाहून नेण्याची क्षमता वाढविणे आवश्यक आहे. महापालिका प्रशासनाने संबंधित अधिकाऱ्यांना कारवाईच्या सूचना दिल्या आहेत. मात्र, पहिल्या टप्प्यातील कामांसाठी निधी आणि निविदा प्रक्रिया पूर्ण होणे बाकी आहे. त्यामुळे प्रस्तावित कारवाई प्रत्यक्षात कधी सुरू होते आणि किती प्रभावीपणे राबविली जाते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### ६७ नाल्यांवर पहिल्या टप्प्यात कारवाई

पिंपरी-चिंचवड शहरातील ३६५ नैसर्गिक नाल्यांच्या ठिकाणी अतिक्रमणे व प्रवाहातील अडथळे आढळले आहेत. त्यापैकी ९३ नाले बुजविले किंवा वळविले आहेत. पहिल्या टप्प्यात ६७ नाल्यांवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी डीपीआर तयार असून, निधी उपलब्ध झाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

# मोरूचे सीमोल्लंघन आणि 'जेन-झी'चा एल्गार!



## भूमिका

**दसरा हा सीमोल्लंघनाचा, नव्या संकल्पांचा आणि विजयाच्या आकांक्षांचा सण. मात्र, बदलत्या काळात या सणाच्या पारंपरिक संकल्पनांनाही नव्याने समजून घेण्याची गरज निर्माण झाली आहे. ज्येष्ठ पिढीसाठी संस्कृती, परंपरा आणि विचारांचे सोने लुटणे महत्त्वाचे असले, तरी आजच्या 'जेन-झी' पिढीला केवळ विचारांचा वारसा नको आहे.**



तिला प्रत्यक्ष कृतीतून बदल घडवायचा आहे. मोरूच्या तीन पिढ्यांमधील संवादातून हाच पिढ्यांमधील संघर्ष आणि सामाजिक वास्तव प्रभावीपणे समोर येते.

एका बाजूला परंपरांचा अभिमान बाळगणारी ज्येष्ठ पिढी, तर दुसऱ्या बाजूला व्यवस्थेतील त्रुटींवर प्रश्न उपस्थित करणारी तरुण पिढी, असे या संघर्षाचे स्वरूप आहे. पूर्वीच्या पिढ्यांनी संस्कार, विचारधारा आणि सांस्कृतिक अस्मितेला महत्त्व दिले. मात्र, या विचारांचा प्रत्यक्ष समाजजीवनात किती उपयोग झाला, हा प्रश्न आजची तरुणाई विचारत आहे. केवळ भाषणे, मेळावे आणि घोषणांमधून परिवर्तन घडत नसते. त्यासाठी ठोस कृती आणि व्यवस्थेत सुधारणा करण्याची इच्छाशक्ती आवश्यक असते. आजच्या तरुणांसमोरील आव्हानेही तितकीच गंभीर आहेत. शिक्षणातील अनिश्चितता, परीक्षांमधील गैरप्रकार, रोजगाराच्या मर्यादित संधी आणि वाढती आर्थिक असुरक्षितता यामुळे तरुणांचा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होत आहे.

अशा परिस्थितीत विजयादशमीचे महत्त्व केवळ शस्त्रपूजन किंवा सीमोल्लंघनापुरते मर्यादित राहत नाही. अन्याय, भ्रष्टाचार आणि निष्क्रियतेच्या सीमा ओलांडणे, हेही काळाचे आव्हान बनले आहे.मोरूच्या संवादातून परदेशात जाण्याच्या स्वप्नालाही वेगळी दिशा मिळते. मागील पिढ्यांसाठी परदेशात स्थायिक होणे हे यशाचे प्रतीक होते. मात्र, देशातच राहून परिस्थिती बदलण्याची तरुणांची इच्छा ही सकारात्मक बाब आहे. अर्थात, केवळ संताप व्यक्त करून किंवा आंदोलनात सहभागी होऊन बदल घडत नाही. त्यासाठी लोकशाही मार्गाने संघटित प्रयत्न, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि जबाबदार नागरिकत्व आवश्यक आहे.

त्याचवेळी ज्येष्ठ पिढीच्या अनुभवांना पूर्णपणे नाकारूनही चालणार नाही. परंपरेतील चांगल्या मूल्यांचे जतन आणि कालबाह्य विचारांचे परिवर्तन, यांचा समतोल साधणे गरजेचे आहे. तरुणांच्या प्रश्नांना देशविरोधी ठरवण्याऐवजी त्यामागील अस्वस्थता समजून घेतली पाहिजे. प्रश्न विचारणे हा लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे. मात्र, आंदोलनाची दिशा विधायक आणि संविधानाच्या चौकटीत राहणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

दसऱ्याचा खरा संदेश वाईट प्रवृत्तींवर विजय मिळवण्याचा आहे. त्यामुळे आजचे सीमोल्लंघन भौगोलिक सीमा ओलांडण्यापेक्षा सामाजिक आणि मानसिक बंधने तोडण्यात आहे. विचारांना कृतीची जोड, परंपरेला विवेकाची साथ आणि तरुणांच्या आकांक्षांना संधी मिळाली, तरच परिवर्तन शक्य होईल. 'जेन-झी'चा एल्गार हा केवळ पिढ्यांमधील संघर्ष न राहता नव्या भारताच्या उभारणीचा संकल्प ठरला, तर विजयादशमीचा उत्सव खऱ्या अर्थाने सार्थकी लागेल.

## प्रासंगिक »

### अनोखा पूल

**एका गावात दोन वस्त्यांमध्ये खोल ओढा होता. पावसाळ्यात ओढ्याला पाणी आल्यामुळे मुलांना शाळेत जाणे कठीण होत असे. गावकऱ्यांनी अनेकदा पूल बांधण्याची मागणी केली; पण प्रत्येकजण दुसऱ्याने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा करत होता.**

त्याच गावात सई नावाची तरुण मुलगी राहत होती. तिने गावातील सुतार, गवंडी आणि इतर कुशल लोकांना एकत्र बोलावले. तिने ग्रामपंचायतीकडे परवानगी मागितली आणि सर्वांच्या मदतीने सुरक्षित पादचारी पूल उभारण्याचा प्रस्ताव मांडला.

काही लोकांनी तिची थट्टा केली. एवढे मोठे काम एका मुलीला कसे जमणार, असे ते म्हणाले. मात्र, सईने हार मानली नाही. तिने गावकऱ्यांना कामाची गरज पटवून दिली. अखेर अनेकांनी श्रमदान केले आणि ग्रामपंचायतीने आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिले. काही दिवसांत पूल तयार झाला. आता मुलांना शाळेत जाणे सोपे झाले. पूर्वी टीका करणारे गावकरीही सईचे कौतुक करू लागले.सई म्हणाली, "समस्या सर्वांची असते, म्हणून तिचे निराकरण करण्याची जबाबदारीही सर्वांचीच असते."

- तात्पर्य : सामूहिक सहभाग आणि पुढाकार यांच्या बळावर समाजातील मोठ्या समस्यांवरही मार्ग काढता येतो.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे राजकारण हे कठोर निर्णय, अचूक रणनीती आणि नियंत्रित संयम यांचा मेळ मानले जाते. राजकीय वर्तुळात त्यांच्या सक्रियतेबाबत चर्चा सुरू असताना त्यांनी पुन्हा देशाच्या राजकीय पटावर आपली उपस्थिती ठळक केली.

## सत्तेची रणनीती आणि अस्तित्वाची लढाई!

दिल्लीतील आंदोलनांवरील पोलिसांची भूमिका असो किंवा विविध राज्यांतील दौरे, शाह यांच्या हालचालींमधून सत्ताधारी भाजपची राजकीय रणनीती स्पष्ट होते. मात्र, राजकीय दरारा निर्माण करणे आणि लोकशाहीतील असंतोषाचे निराकरण करणे, या दोन वेगळ्या बाबी आहेत. आंदोलनांवर नियंत्रण ठेवताना नागरिकांच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याचे संरक्षण करणे, हेही सरकारचे तितकेच महत्त्वाचे कर्तव्य आहे.

भाजपसमोर आगामी विधानसभा निवडणुकांची आव्हाने आहेत. उत्तर प्रदेश, गोवा, मणिपूर आणि उत्तराखंडमध्ये पक्षाला आपली राजकीय पकड कायम ठेवावी लागणार आहे. पंजाबमध्ये मात्र परिस्थिती अधिक गुंतागुंतीची आहे. अकाली दलाशी संभाव्य युती, आम आदमी पक्षाला रोखण्याची रणनीती आणि संघटनात्मक विस्तार या माध्यमांतून भाजप आपली ताकद वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. सर्व जागा लढवण्याची घोषणा करण्याऐवजी स्थानिक राजकीय समीकरणांचा विचार करणे, हे



व्यावहारिक राजकारणाचे लक्षण आहे. मात्र, निवडणुकीतील यश केवळ रणनीतीवर नव्हे, तर जनतेच्या प्रश्नांना दिलेल्या उत्तरांवरही अवलंबून असते.

दुसरीकडे, बहुजन समाज पक्षाची घसरण ही भारतीय राजकारणातील महत्त्वाची घडामोड आहे. एकेकाळी उत्तर प्रदेशात स्वबळावर सत्ता मिळवणाऱ्या या पक्षाची राजकीय ताकद आज मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. दलित मतदारांचा विश्वास, सामाजिक न्यायाची भूमिका आणि व्यापक सामाजिक समीकरणे यांच्या बळावर मायावतींनी पक्षाला राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून दिली होती. मात्र, बदलत्या राजकीय परिस्थितीशी जुळवून घेण्यात पक्षाला अपयश आले. नेतृत्वाभोवती केंद्रित झालेली पक्षरचना, प्रभावी संघटनात्मक विस्ताराचा अभाव आणि राजकीय आघाड्यांबाबतची अनिश्चितता यामुळे बसपाच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

बसपाची घसरण ही केवळ एका पक्षाची समस्या नाही. सामाजिक प्रतिनिधित्व आणि वंचित घटकांच्या राजकीय सहभागासाठी उभ्या राहिलेल्या चळवळींसमोरील आव्हानांचेही ते प्रतिबिंब आहे. मतांचे जागांमध्ये रूपांतर करण्यासाठी विश्वासार्ह नेतृत्व, व्यापक जनसंपर्क आणि बदलत्या सामाजिक आकांक्षांची जाण आवश्यक असते.

एकीकडे भाजप आपली राजकीय पकड मजबूत करण्यासाठी रणनीती आखत आहे, तर दुसरीकडे बसपाला अस्तित्व टिकवण्याची धडपड करावी लागत आहे. या दोन्ही घडामोडी भारतीय लोकशाहीतील बदलते वास्तव दाखवतात. अखेरीस, राजकारणात दरारा आणि वारसा यांपेक्षा जनतेचा विश्वास अधिक महत्त्वाचा असतो. तो टिकवण्यासाठी सत्ता असो वा विरोधी पक्ष, दोघांनाही लोकांच्या अपेक्षांना कृतीतून उत्तर द्यावे लागेल.

## ।। अभंगवाणी ।।



थोडें आहे थोडें आहे ।
चित्त साहे जालिया ॥१॥

हर्षामर्ष नाहीं अंगीं ।
पांडुरंगीं सरलें तें ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मुंबईत साडेसहा वर्षांत दुर्घटनांचे ७२० बळी!

## २,४०८ जखमी; इमारती कोसळणे आणि आगींमध्ये सर्वाधिक जीवितहानी

महाईन्यूज । मुंबई

**मुंबईत २०२० ते सप्टेंबर २०२६ या सुमारे साडेसहा वर्षांच्या कालावधीत विविध आपत्कालीन दुर्घटनांमध्ये ७२० नागरिकांचा मृत्यू झाला असून, २,४०८ नागरिक जखमी झाले. इमारतींचा भाग कोसळणे, आग लागणे, समुद्रात किंवा नाल्यात पडणे अशा दुर्घटनांमुळे मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाल्याचे माहिती अधिकारातून समोर आले आहे.**



देशाची आर्थिक राजधानी असलेले मुंबई शहर हे पावसाळ्यात दुर्घटनांची राजधानी म्हणून ओळखले जाऊ शकते. दरवर्षी पावसाळ्यात झाड पडून कोणाचा मृत्यू होतो, कोणी गटारद्वारात (मॅनहोल) वाहून जातात, तर कोणी नाल्यात पडतात, कोणी धोकादायक इमारतीच्या ढिगाऱ्याखाली गाडले जातात. एरव्ही हे शहर सुरक्षित म्हणून ओळखले जात असले तरी कामासाठी बाहेर पडलेला माणूस सुखरूप घरी येईल की नाही हे सांगू शकत नाही. मुंबईत नागरिकांचे जीव धोक्यात आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ते शकील अहमद शेख यांनी मागविलेल्या माहितीतून मुंबईतील आपत्कालीन दुर्घटनांची आकडेवारी उघड झाली आहे. मुंबई महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, या कालावधीत घरे, भिंती आणि इमारतींचे भाग कोसळण्याच्या घटनांमध्ये १७९ जणांचा मृत्यू झाला, तर ८६४ जण जखमी झाले. आग आणि शॉर्टसर्किटच्या घटनांमध्ये १६८ जणांचा मृत्यू, तर १,०४८ जण जखमी झाले. या दोन प्रकारच्या दुर्घटनांमध्येच मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली आहे.

समुद्रात किंवा विहिरीत पडून १९५ जणांचा मृत्यू झाला असून, ४४ जण जखमी झाले. मॅनहोल किंवा नाल्यात पडल्याने ५६ जणांना जीव गमवावा लागला, तर ७७ जण जखमी झाले. दरड कोसळण्याच्या घटनांमध्ये ३९ मृत्यू आणि ३३ जखमींची नोंद आहे. वीजेचा धक्का लागून ४० जणांचा मृत्यू, तर ५७ जण जखमी झाले. झाडे आणि फांद्या पडल्याने २२ जणांचा मृत्यू झाला असून, ३०६ जण जखमी झाले आहेत.

### साडेसहा वर्षांतील प्रमुख दुर्घटना आणि हानी:

- घरे, भिंती व इमारती कोसळणे: १७९ मृत्यू; ८६४ जखमी
- आग व शॉर्टसर्किट: १६८ मृत्यू; १,०४८ जखमी
- समुद्र किंवा विहिरीत पडणे: १९५ मृत्यू ; ४४ जखमी
- मॅनहोल अथवा नाल्यात पडणे: ५६ मृत्यू ; ७७ जखमी
- वीजप्रवाहाचा धक्का (करंट): ४० मृत्यू ; ५७ जखमी
- दरड कोसळणे: ३९ मृत्यू ; ३३ जखमी
- झाडे व फांद्या पडणे: २२ मृत्यू ; ३०६ जखमी

# पुढच्या ४-५ महिन्यात देशात मोठी गडबड होईल; राज ठाकरे यांचे मोठे विधान

महाईन्यूज । मुंबई

**देशातील दुष्काळ, वाढता असंतोष आणि राजकीय घडामोडींवर भाष्य करताना राज ठाकरे यांनी खळबळजनक विधान केले. येत्या काळात परिस्थिती गंभीर होऊन अख्खा देश रस्त्यावर उतरू शकतो, असा दावा राज ठाकरेंनी केला आहे. तसेच पुढे काही काळ असाही येऊ शकतो, जेव्हा देशाला पंतप्रधानच नसतील असाही दावा राज ठाकरे यांनी केला आहे.**



देशात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात आंदोलन सुरू असतानाच रिजीम चेंज करण्याचा विषय पुढे आला. यावरून भाजपा आणि विरोधी पक्षांमध्ये वाद सुरू असताना आता राज ठाकरे यांनी याबाबत मोठे विधान केले आहे. आज पत्रकारांशी संवाद साधत असताना त्यांना संजय राऊत यांच्या एका विधानावर प्रश्न विचारला असता ते म्हणाले, पुढील चार-पाच महिन्यात देशात काहीतरी मोठी गडबड होण्याची शक्यता आहे.

शिवसेनेचे (ठाकरे) नेते संजय राऊत यांनी केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्री हरदीप पुरी यांचा जेफ्री एपस्टीनबरोबरचा एक फोटो एक्सवर शेअर केला. तसेच लवकरच पंतप्रधान मोदी पायउतार होणार असल्याचे म्हटले. यावर राज ठाकरे यांना प्रश्न विचारण्यात आल्यानंतर त्यांनी उपरोक्त विधान केले. राज ठाकरे यावर म्हणाले, “पुढील काळात खूप गोष्टी बाहेर येतील. सरकार चुकांवर चुका करत राहणार. आता हे थांबणार नाही.”

पुढच्या काही महिन्यांत संपूर्ण देश रस्त्यावर आला तरी मला आश्चर्य वाटणार नाही, असेही विधान राज ठाकरे यांनी यावेळी केले.

“काही महिन्यांपूर्वी “NEET परीक्षेबाबत आंदोलन झाले, आता निवडणूक आयोगाच्या विषयावर आंदोलन सुरू आहे. नीट आंदोलनावेळी जी मुले, विद्यार्थी रस्त्यावर उतरले त्यातील प्रत्येकजण काही विद्यार्थी नव्हता. पण त्यांच्या मनात कुठल्या ना कुठल्या गोष्टीचा राग होता. तो त्या माध्यमातून बाहेर आला. महाराष्ट्रातील आजची परिस्थिती पाहिली तर सरकारनेच ३०० हून अधिक तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला आहे. पुढे आणखी परिस्थिती खराब होऊ शकते. अन्नधान्याची टंचाई होऊ शकते”, असा अंदाज राज ठाकरे यांनी बांधला.

देशात सुरू असलेल्या आंदोलनावर भाजपाने अराजकतेचा आरोप केला आहे. यावर प्रश्न विचारला असता राज ठाकरे म्हणाले की, शांततेत सुरू असलेल्या आंदोलनावर पोलिसांनी लाठीचार्ज केला. पोलिसांच्या गणवेशात तुम्ही तुमच्या पक्षाची माणसे घुसवली. तुम्ही हंगामा केला. आंदोलन करणाऱ्या मुलांनी काहीच केले नव्हते.

### बिश्नोई गँगचा बंदोबस्त का होत नाही?

बॉलिवूड आणि अभिनेत्यांवर होणाऱ्या हल्ल्यांमागे बिश्नोई गँगचा हात असल्याच्या मुद्द्यावर बोलताना राज ठाकरे म्हणाले, “देशात सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. जर बिश्नोई गँग उघडपणे सांगत असेल की हे कृत्य आम्हीच केलंय, तर त्याचा बंदोबस्त का होत नाही? या लोकांना कायद्याची कोणतीही भीती उरलेली नाही. भीती नाही याचा अर्थ तुम्ही यांना पोसत आहात का?” असा थेट सवाल त्यांनी सरकारला विचारला. “लॉरेन्स बिश्नोईला तुरुंगातून बाहेर काढून नागडं करून फटकावलं पाहिजे,” अशा शब्दांत राज ठाकरे यांनी आपला संताप व्यक्त केला.

### ‘काही काळ देशाला पंतप्रधानच नसतील’

पुढे आणखी भीषण परिस्थिती येणार असल्याचे सांगताना राज ठाकरे म्हणाले, सरकारला ही परिस्थिती झेपणार नाही. तसेच असा एक छोटा काळ येईल, जेव्हा या देशाला पंतप्रधानच नसतील, असा मोठा दावाही राज ठाकरे यांनी केला.

# दास, रांका यांची तिहार तुरुंगातून सुटका!

## सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपकेंची शाहरुख खानच्या व्हिडीओची पोस्ट चर्चेत!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**जंतर-मंतर येथील प्रतिबंधित आंदोलन क्षेत्रात प्रवेश केल्याप्रकरणी अटकेत असलेले 'कॉक्रोच जनता पार्टी'चे नेते सौरव दास आणि आशुतोष रांका यांची सात दिवसांनंतर कारागृहातून सुटका झाली आहे. दिल्ली पोलिसांच्या कोठडी वाढवण्याच्या मागणीनंतरही विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी दोन्ही नेत्यांची सुटका करण्याचे आदेश बुधवारी दिले.**



दिल्ली पोलिसांनी दास आणि रांका यांच्या न्यायालयीन कोठडीत आणखी तीन दिवसांची वाढ करण्याची विनंती दंडाधिकाऱ्यांकडे केली होती. यावर झालेल्या सुनावणीदरम्यान दोन्ही नेत्यांच्या वतीने जामीनदार सादर करण्यात आले. दंडाधिकाऱ्यांनी पोलिसांची मागणी फेटाळून लावत दोन्ही नेत्यांच्या सुटकेचा मार्ग मोकळा केला.

१४ ऑक्टोबर रोजी जंतर-मंतर क्षेत्रात विनापरवानगी प्रवेश केल्याचा आणि शांतता भंगाचे बॉण्ड मोडल्याचा आरोप दास आणि रांका यांच्यावर ठेवण्यात आला होता. त्यानंतर दिल्ली पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन दंडाधिकाऱ्यांसमोर हजर केले असता, सुरुवातीला त्यांना ५ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. त्यानंतर १९ ऑक्टोबर रोजी त्यांच्या कोठडीत पुन्हा दोन दिवसांची वाढ करण्यात आली होती, ज्याची मुदत बुधवारी संपत होती.

दरम्यान, आज दोन्ही नेत्यांच्या न्यायालयीन कोठडीला आव्हान देणाऱ्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयातही सुनावणी झाली. मात्र, उच्च न्यायालयाने या प्रकरणात तात्काळ हस्तक्षेप करण्यास नकार दिला. विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांसमोरील सुनावणीचा निर्णय येईपर्यंत वाट पाहावी आणि काही तक्रार असल्यास वरिष्ठ न्यायालयात दाद मागावी, असे निर्देश उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना दिले होते.

सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती सुब्रमण्यम प्रसाद यांनी याचिकाकर्त्यांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. १० ऑक्टोबर रोजी शांतता राखण्याचे वैयक्तिक हमीपत्र दिल्यानंतर अवघ्या दुसऱ्याच दिवशी ११ ऑक्टोबरला त्याचा भंग करण्यात आल्याचे न्यायालयाने निदर्शनास आणून दिले.

जंतरमंतरसारख्या प्रतिबंधित क्षेत्रात घुसून तिरंगा फडकावत पुन्हा आंदोलन केल्याचा आरोप सीजेपी नेत्यांवर आहे. यावर भाष्य करताना न्यायमूर्तींनी विचारले, "जेव्हा तुम्ही दिलेल्या आश्वासनाचा स्वतःच भंग करता, तेव्हा तपास यंत्रणांनी तुमच्याकडून कठोर पुराव्यांची मागणी का करू नये?" तसेच, सत्र न्यायालयात याचिका दाखल करण्याचा पर्याय उपलब्ध असताना थेट उच्च न्यायालयात का आलात, असा सवालही खंडपीठाने उपस्थित केला.

### दिपकेंची X पोस्ट चर्चेत!

तिहार तुरुंगात अटकेत असलेले 'कॉक्रोच जनता पार्टी'चे नेते सौरव दास आणि आशुतोष रांका यांची सात दिवसांनंतर कारागृहातून सुटका झाली आहे. यानंतर अभिजीत दिपके यांनी केलेली X पोस्ट चर्चेत आली आहे.

# सौदी अरेबियात 'अश्लील कृत्या'प्रकरणी बांगलादेशी तरुणाला मृत्युदंड

**महाईन्यूज । सौदी अरेबिया**

**सौदी अरेबियामध्ये कथित 'अश्लील कृत्य' केल्याप्रकरणी बांगलादेशचा २२ वर्षीय तरुण नझरुल इस्लाम बासिर याला मृत्युदंड देण्यात आला. १४ ऑक्टोबर रोजी मक्का येथे नझरुलसह सिती अख्तर नावाच्या महिलेलाही फाशी देण्यात आली. सौदी अरेबियाच्या गृह मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, मक्का येथील एका मशिदीत अश्लील कृत्य केल्याप्रकरणी न्यायालयाने दोषी ठरवल्यानंतर दोघांना इस्लामी कायद्यातील 'ताझीर' तरतुदीनुसार ही शिक्षा सुनावण्यात आली. या घटनेमुळे नझरुलच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, त्यांना फाशीपूर्वी कोणतीही पूर्वकल्पना दिली नसल्याचा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला आहे.**



ब्राह्मणबारिया सदर उपजिल्ह्यातील सुलतानपूर युनियनअंतर्गत बिरामपूर गावचा रहिवासी असलेला नझरुल चार भावंडांमध्ये सर्वात मोठा होता. कुटुंबाचा आर्थिक भार हलका करण्यासाठी तो १० नोव्हेंबर २०२२ रोजी रोजगारासाठी सौदी अरेबियाला गेला होता आणि तिथे तो स्वच्छता कर्मचाऱ्याचे काम करत होता. मक्कातील मशिदीत अनैतिक कृत्य केल्याच्या आरोपावरून सौदी पोलिसांनी त्याला आणि सिती अख्तरला अटक केली होती. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, नझरुलने कोठडीत सुमारे तीन वर्षे आणि तीन महिने घालवले, या काळात तो दर रविवारी फोनवरून कुटुंबीयांच्या संपर्कात होता.

सौदी मंत्रालयाने या प्रकरणी कारवाईची माहिती दिली असली, तरी बांगलादेशी अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सौदी अरेबियाकडून मिळालेल्या सुरुवातीच्या नोंदींमध्ये या दोघांना ऑगस्ट २०२३ मध्ये सायबर गुन्हा आणि व्यभिचारासारख्या वेगवेगळ्या आरोपांखाली अटक झाल्याचे नमूद होते. मात्र, या कागदपत्रांमध्ये मृत्युदंडाच्या शिक्षेचा किंवा फाशीच्या निर्णयाचा कोणताही उल्लेख नव्हता. त्यामुळे अटकेची नेमकी कारणे, न्यायालयीन प्रक्रिया आणि फाशीची शिक्षा कधी व कशी ठरली, याबाबत मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नझरुलचे वडील अब्दुल बासिर यांनी मोठ्या मुलाला रोजगारासाठी सौदी अरेबियाला पाठवण्यासाठी सात लाख बांगलादेशी टाका (अंदाजे ५,३६,२७३ भारतीय रुपये) कर्ज घेतले होते. मुलगा परदेशात जाऊन काम करेल आणि कुटुंबाचे भविष्य सुधारेल, अशी त्यांची अपेक्षा होती. मात्र, मुलाच्या मृत्यूमुळे त्यांच्यावर दुःखासोबतच कर्जफेडीचा मोठा भार आला आहे.

'द डेली स्टार'च्या वृत्तानुसार, अब्दुल बासिर म्हणाले, "कर्ज देणारे आता पैसे परत करण्यासाठी माझ्यावर दबाव आणत आहेत. मला माझ्या मुलाचा मृतदेह घरी आणायचा आहे. त्याला योग्य कारणाशिवाय फाशी देण्यात आली असेल, तर मला न्याय हवा आहे."

नझरुलच्या कुटुंबीयांनी सौदी प्रशासनाने फाशीपूर्वी त्यांना माहिती दिली नाही आणि नझरुलला स्वतःची बाजू मांडण्याची संधी मिळाली नाही, असा आरोप केला आहे. या आरोपांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही.

दरम्यान, मुलाच्या मृत्यूची बातमी समजल्यानंतर त्याची आई रहीमा बेगम यांना वारंवार अश्रू अनावर झाल्याचे वृत्त आहे. तसेच, नझरुलच्या मृत्यूची बातमी ऐकल्यानंतर त्याची आत्या आबेदा बेगम यांचा गेल्या बुधवारी रात्री हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. नझरुलच्या मृत्यूमुळे त्याचे कुटुंब शोकाकुल झाले असून, मृतदेह मायदेशी आणणे, संबंधित प्रकरणाची चौकशी करणे आणि न्याय मिळवणे अशा प्रमुख मागण्या त्यांनी केल्या आहेत.

### मृतदेह मायदेशी आणण्याची कुटुंबीयांची मागणी

नझरुलच्या कुटुंबीयांनी बांगलादेश सरकारकडे नझरुलच्या मृत्यूची चौकशी करावी आणि मृतदेह सरकारी खर्चाने मायदेशी आणावा, अशा मागण्या केल्या आहेत. या प्रकरणाबाबत विचारले असता, ब्राह्मणबारियाचे उपजिल्हाधिकारी मोहम्मद अबू सईद यांनी 'द डेली स्टार'ला सांगितले की, प्रशासनाकडून अद्याप कोणतेही निर्देश मिळालेले नाहीत आणि कुटुंबीयांनीही अर्ज सादर केलेला नाही. नझरुलचा मृतदेह कायदेशीर प्रक्रियेनुसार बांगलादेशात आणल्यास प्रशासनाकडून नियमांनुसार मदत केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.



# अलिजेहची नवी इनिंग!

बॉलिवूडमधील स्टार किड्समध्ये सलमान खानची भाची अलिजेह अग्निहोत्रीचाही समावेश होतो. सुमारे 3 वर्षांपूर्वी प्रदर्शित 'फर्रे" चित्रपटातून तिने बॉलिवूडमध्ये पदार्पण केले होते. आता अलिजेहचे नशीब उजळले असून तिला एक चित्रपट मिळाला आहे. अलिजेहचा आगामी चित्रपट हॉरर-कॉमेडी जॉम्बी थ्रिलर धाटणीचा असणार आहे. अलिजेह ही सलमान खानची मोठी बहिण अलवीरा आणि अतुल अग्निहोत्री यांची मुलगी आहे. स्वत:चा मामा आणि पित्यामुळे ती बॉलिवूडमध्ये नाम कमावू पाहत आहे. तिच्या आगामी चित्रपटाचे नाव 'हैज-कॉलेज फेस्ट" असणार आहे. हा एक हॉरर कॉमेडी आणि जॉम्बी थ्रिलरपट असेल. यात अलिजेहसोबत युट्यूबर आशीष चंचलानी महत्त्वाच्या भूमिकेत दिसेल. चित्रपट कॉलेज फेस्टची निर्मिती टीव्हीएफकडून केली जाणार आहे. तर याची दिग्दर्शनाची धुरा वैभव बंधू सांभाळणार आहे. कॉलेज फेस्ट हा जेन-जीची कॉलेज स्टोरी दाखविणारा चित्रपट असेल. यात एका कॉलेज फेस्टदरम्यान रहस्यमय संक्रमण फैलावते आणि यामुळे कॉलेजचे विद्यार्थी जॉम्बीमध्ये बदलतात असे दाखविण्यात आले आहे. अलिजेहची भूमिका चित्रपटात अत्यंत महत्त्वाची असणार आहे. हा चित्रपट थेट ओटीटीवर प्रदर्शित केला जाणार आहे. कॉलेज फेस्ट चित्रपट अमेझॉन प्राइम व्हिडिओवर ऑनलाइन स्ट्रीम करण्यात येणार आहे.



# घटस्फोटानंतर उर्मिला कानेटकरचा मोठा निर्णय!

मराठी मनोरंजनविश्वातील अभिनेत्री उर्मिला कानेटकर सध्या तिच्या सोशल मीडिया पोस्टमुळे चर्चेत आली आहे. अभिनेता आदिनाथ कोठारेसोबत विभक्त होण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर उर्मिलानं आता इन्स्टाग्रामवरील आपल्या नावात बदल केला आहे. दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर तिनं ही माहिती चाहत्यांसोबत शेअर केली. इन्स्टाग्रामवरील नाव बदलल्याचा आनंद व्यक्त करत तिनं 'Thank you Instagram' असं म्हटलं आहे. तिच्या या पोस्टनंतर सोशल मीडियावर विविध चर्चा सुरू झाल्या आहेत. उर्मिला कानेटकर ही अभिनेत्री आजवर अनेकदा 'उर्मिला कोठारे' या नावानंही ओळखली जात होती. मात्र, आदिनाथ कोठारेसोबत विभक्त होण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर तिच्या सोशल मीडिया अकाउंटवरील नाव कधी बदलणार, याकडे चाहत्यांचं लक्ष लागलं होतं. अखेर उर्मिलानं आपल्या इन्स्टाग्राम प्रोफाइलवरील नावात बदल केला आहे. दसऱ्याच्या दिवशी उर्मिलानं इन्स्टाग्राम स्टोरीवर आपल्या प्रोफाइलचा स्क्रीनशॉट शेअर केला. यासोबत तिनं चाहत्यांना दसऱ्याच्या शुभेच्छाही दिल्या. 'तुम्हा सर्वांना माझ्याकडून दसऱ्याच्या खूप शुभेच्छा,' असं तिनं या पोस्टमध्ये म्हटलं. त्याचबरोबर इन्स्टाग्रामवरील नाव बदलल्याबद्दल आनंद व्यक्त करत 'Thank you Instagram' असंही लिहिलं. उर्मिलानं दसऱ्याच्या मुहूर्तावर शेअर केलेल्या या पोस्टमुळे तिच्या आयुष्यातील नव्या सुरुवातीची चर्चा रंगली आहे. मात्र, नावातील बदलाबाबत तिनं यापलीकडे कोणतंही सविस्तर स्पष्टीकरण दिलेलं नाही.

# 'जेलर 2'ची बॉक्स ऑफिसवर विक्रमी कमाई!

दाक्षिणात्य सुपरस्टार रजनीकांत यांचा 'जेलर २' सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. भारतासह जागतिक स्तरावरही चित्रपटाने चांगली कमाई केली आहे. आता सहा दिवसांत चित्रपटाने ५०० कोटींहून अधिक कलेक्शन केलं आहे.

रजनीकांत यांची मुख्य भूमिका असलेला आणि नेल्सन दिलीपकुमार दिग्दर्शित 'जेलर २' हा अ‍ॅक्शन ड्रामा जगभरातील बॉक्स ऑफिसवर नवनवे विक्रम करत आहे. प्रदर्शनाचा पहिला आठवडा पूर्ण होण्याच्या आधीच या चित्रपटाने भारतात ३३७ कोटी रुपयांहून अधिक ग्रॉस कलेक्शन केलं. तर २८७.८० कोटी रुपयांचं नेट कलेक्शन केलं आहे. तर जगभरातील बॉक्स ऑफिसवर चित्रपटाची कमाई ५४१ कोटी रुपयांपुढे गेली आहे. प्रदर्शनाच्या सहाव्या दिवशी, म्हणजेच पहिल्या मंगळवारी, 'जेलर २'ने देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर १५,५२९ शोमधून ४५.५५ कोटी रुपयांहून अधिक कमाई केली. यामध्ये सर्वाधिक वाटा मूळ तमिळ व्हर्जनचा होता. तमिळ व्हर्जनने ७,८२८ शोमधून ३१.२० कोटी रुपये कमावले. त्यानंतर डब केलेल्या तेलुगू व्हर्जनने २,२९३ शोमधून ८.७५ कोटी रुपये, तर हिंदी व्हर्जनने ५,२३० शोमधून ५ कोटी रुपयांची कमाई केली.



दसऱ्याच्या सुट्टीचा फायदा 'जेलर २'च्या कमाईला झाला. प्रदर्शनाच्या सहाव्या दिवशी, म्हणजेच मंगळवारी, चित्रपटाच्या देशांतर्गत बॉक्स ऑफिस कलेक्शनमध्ये ७.६ टक्क्यांनी वाढ झाली. सॅक्निल्कच्या वृत्तानुसार या दिवशी चित्रपटाने देशभरातील १५,५२९ शोमधून ४५.५५ कोटी रुपयांची कमाई केली. याआधी पहिल्या सोमवारी, म्हणजेच पाचव्या दिवशी चित्रपटाने ४२.३५ कोटी रुपये कमावले होते. प्रदर्शनाच्या पहिल्या वीकेंडमध्येही चित्रपटाने दमदार कमाई केली होती. पहिल्या रविवारी (चौथ्या दिवशी) चित्रपटाने ५५.८५ कोटी रुपये, तर शनिवारी (तिसऱ्या दिवशी) ४७.२५ कोटी रुपयांची कमाई केली होती.

'जेलर २'ची देशांतर्गत बॉक्स ऑफिसवरील सर्वात कमी एकदिवसीय कमाई प्रदर्शनाच्या पहिल्या शुक्रवारी, म्हणजेच चित्रपट प्रदर्शित झाल्याच्या दुसऱ्या दिवशी झाली. या दिवशी चित्रपटाने १३,१५७ शोमधून ३७.१० कोटी रुपये कमावले. मात्र, त्याच्या आदल्या दिवशीच रजनीकांत यांच्या या चित्रपटाने भारतातील १६,५५९ स्क्रीन्सवरून ५९.७० कोटी रुपयांची कमाई केली होती. ही चित्रपटाची आतापर्यंतची सर्वाधिक एकदिवसीय कमाई ठरली.

'जेलर २'ने जगभरातील बॉक्स ऑफिसवर चार दिवसांच्या वीकेंडमध्ये ४१८.२५ कोटी रुपयांची कमाई केली. यासह तमिळ चित्रपटांच्या इतिहासातील सर्वात मोठ्या ओपनिंग वीकेंडचा विक्रम या चित्रपटाने आपल्या नावावर केला. तसेच २०२६ मधील आतापर्यंतचा सर्वाधिक कमाई करणारा तमिळ चित्रपट ठरला आहे. गुरुवारी, प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी परदेशात ५७ कोटी रुपयांची कमाई करत या चित्रपटाने यंदा परदेशात सर्वाधिक ओपनिंग करणाऱ्या भारतीय चित्रपटाचा विक्रमही नोंदवला.

# तेंबा बावुमाचा वर्ल्ड रेकॉर्ड!

## कसोटी इतिहासात अशी कामगिरी करणारा जगातील पहिला कर्णधार; मोहम्मद अझरूद्दीनला टाकलं मागे

**महाईन्यूज । मुंबई**

**दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार तेंबा बावुमाने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात ऐतिहासिक खेळी साकारली. मंगळवारी (२० ऑक्टोबर) गेकेबेरहा येथील सेंट जॉर्ज पार्क मैदानावर त्याने पहिल्या डावात १७९ धावांची शानदार खेळी साकारली. पावसामुळे व्यत्यय आलेल्या या सामन्यात बावुमाने आपल्या खेळीने दक्षिण आफ्रिकेचा डाव सावरला. तेंबा बावुमाने या खेळीसह विश्वविक्रम आपल्या नावे केला आहे.**



तेंबा बावुमाच्या खेळीच्या बळावर दक्षिण आफ्रिकेने दमदार पुनरागमन करत ९ बाद ४२५ धावांपर्यंत मजल मारली. तिसऱ्या दिवसाचा खेळ संपण्यापूर्वी यजमानांनी डाव घोषित केला. दक्षिण आफ्रिकेची पहिल्या दिवशी २ बाद १२ धावा अशी बिकट अवस्था असताना बावुमा फलंदाजीसाठी मैदानात उतरला. दुसऱ्या दिवशी दक्षिण आफ्रिकेच्या विकेट्स पडण्याचं सत्र सुरूच राहिलं आणि संघाची अवस्था ६ बाद ११० अशी झाली. मात्र, कर्णधार बावुमाने हार न मानता संयमी आणि आक्रमक फलंदाजीचा सुरेख मेळ साधला. त्याने मार्को यान्सन आणि सायमन हार्मर यांच्यासह अनुक्रमे सातव्या आणि आठव्या विकेटसाठी मोठ्या भागीदाऱ्या रचत संघाला मजबूत धावसंख्येपर्यंत पोहोचवलं.

१७९ धावांच्या खेळीसह बावुमाने कसोटी क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध १५० किंवा त्याहून अधिक धावा करणारा वयस्कर कर्णधार असल्याचा विक्रम आपल्या नावावर केला. त्याने भारताचा माजी कर्णधार मोहम्मद अझरुद्दीन यांचा विक्रम मोडला. अझरुद्दीन यांनी १९९८ मध्ये ईडन गार्डन्सवर स्टीव्ह वॉ यांच्या नेतृत्वाखालील ऑस्ट्रेलियन संघाविरुद्ध नाबाद १६३ धावांची खेळी केली होती. आता बावुमाने १७९ धावांची खेळी करत या विक्रमावर आपलं नाव कोरलं.

दरम्यान, वयाची ३६ वर्षे पूर्ण केल्यानंतर दक्षिण आफ्रिकेच्या भूमीवर कसोटी क्रिकेटमध्ये १५० धावांची खेळी करणारा बावुमा हा ७६ वर्षांतील पहिला कर्णधार ठरला आहे. दक्षिण आफ्रिकेत कसोटी सामन्यात १५० हून अधिक वैयक्तिक धावा करणारा तो दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक वयाचा कर्णधार ठरला. यापूर्वी ऑस्ट्रेलियाचा लिंडसे हॅसेट यांनी १९५० मध्ये गेकेबेरहा येथे ही कामगिरी केली होती.

### दक्षिण आफ्रिकेचा सर्वाधिक वय असलेला कर्णधार

कसोटी क्रिकेटमध्ये १५० धावांची खेळी करणारा बावुमा हा १९५१ नंतरचा दक्षिण आफ्रिकेचा सर्वाधिक वय असलेला कर्णधार ठरला आहे. यापूर्वी डडली नॉर्स यांनी १९५१ मध्ये अशी कामगिरी केली होती. तसेच, २१व्या शतकात कसोटी क्रिकेटमध्ये १५० हून अधिक धावांची खेळी करणारा बावुमा हा तिसऱ्या क्रमांकावरील सर्वात वयस्कर कर्णधार ठरला आहे. त्याच्यापुढे ऑस्ट्रेलियाचा स्टीव्ह वॉ आणि वेस्ट इंडिजचा ब्रायन लारा आहेत.

# स्टीव्ह स्मिथ@ ११,०००! कसोटी क्रिकेटमध्ये राहुल द्रविडला टाकले मागे

**महाईन्यूज । मुंबई**

**ऑस्ट्रेलियाचा अनुभवी फलंदाज स्टीव्ह स्मिथने कसोटी क्रिकेटमध्ये ११,००० धावांचा टप्पा ओलांडला आहे. कसोटी क्रिकेटच्या इतिहासात ११,००० किंवा त्याहून अधिक धावा करणारा तो तिसरा ऑस्ट्रेलियन आणि एकूण १२ वा क्रिकेटपटू ठरला आहे.**



पहिल्या डावात ऑस्ट्रेलियन संघाचा अनुभवी फलंदाज स्टीव स्मिथने संघर्ष करताना ८८ चेंडूंत दोन चौकारांच्या मदतीने २८ धावा केल्या. वियान मुल्डरने ४१ व्या षटकांत त्याला क्लिन बोल्ड केले. यादरम्यान ३७ वर्षीय स्मिथने आपल्या डावातील २८ वी धाव पूर्ण करताच कसोटी क्रिकेटमध्ये ११ हजार धावांचा टप्पा सर केला. कसोटी इतिहासात ११ हजार किंवा त्याहून अधिक धावा करणारा तो ऑस्ट्रेलियाचा तिसरा आणि जगातील एकूण १२ वा फलंदाज ठरला आहे. स्मिथ गकेबरहा येथे आपल्या कारकिर्दीतील १२७ वा कसोटी सामना खेळत आहे.

कसोटी क्रिकेटमध्ये डावांच्या बाबतीत सर्वात जलद ११ हजार धावा पूर्ण करणाऱ्या फलंदाजांच्या एलिट यादीत स्टीव स्मिथ पाचव्या स्थानी पोहोचला आहे. त्याने २२६ डावांत हा पल्ला गाठला आहे. या कामगिरीसह स्मिथने भारताचे माजी दिग्गज फलंदाज राहुल द्रविड आणि दक्षिण आफ्रिकेचे माजी अष्टपैलू जॅक कॅलिस यांना मागे सोडले आहे. या दोन्ही दिग्गजांनी २३४ डावांत ११ हजार धावा पूर्ण केल्या होत्या.

भारताचे महान फलंदाज सचिन तेंडुलकर या यादीत स्मिथच्या पुढेच राहिले असून, ते थोडक्यात मागे पडण्यापासून वाचले आहेत. सचिनने २२३ डावांत हा विक्रम केला होता. श्रीलंकेचे माजी यष्टीरक्षक-फलंदाज कुमार संगकारा या यादीत अव्वल स्थानी असून त्याने अवघ्या २०८ डावांत ११ हजार कसोटी धावा पूर्ण केल्या होत्या. त्याच्यापाठोपाठ ब्रायन लारा (२१३ डाव) आणि रिकी पॉंटिंग (२२२ डाव) यांचा क्रमांक लागतो.

स्टीव स्मिथने ११ हजार कसोटी धावांचा टप्पा गाठून आपल्या सातत्यपूर्ण फलंदाजीची पुन्हा एकदा प्रचिती दिली आहे. ऑस्ट्रेलियाच्या महान फलंदाजांच्या यादीत स्थान मिळवताना त्याने रिकी पॉंटिंग आणि ॲलन बॉर्डरसारख्या दिग्गजांच्या पंक्तीत आपले नाव कोरले आहे. प्रतिकूल परिस्थितीतही धावांचा हा महत्त्वपूर्ण टप्पा गाठणे स्मिथच्या कारकिर्दीतील उल्लेखनीय कामगिरी मानली जात आहे. आता आगामी सामन्यांमध्ये स्मिथ आणखी किती विक्रम आपल्या नावावर करतो, याकडे क्रिकेट चाहत्यांचे लक्ष लागले आहे.

### दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटीत ऑस्ट्रेलियन संघाची पडझड

दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात गकेबरहा येथे सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियन संघाची मोठी पडझड झाली आहे. बुधवारी सामन्याच्या चौथ्या दिवशी ऑस्ट्रेलियन फलंदाजी पूर्णपणे कोलमडली. संघावर फॉलोऑनची नामुष्की ओढवली. यजमान दक्षिण आफ्रिकेच्या ४२५ धावांच्या (९ बाद घोषित) प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव अवघ्या ४२.३ षटकांत ९९ धावांत आटोपला. यामुळे दक्षिण आफ्रिकेने ३२६ धावांची भक्कम आघाडी घेतली आहे. या खराब कामगिरीमुळे ऑस्ट्रेलियन संघासमोर आता दुसऱ्या डावात दमदार फलंदाजी करून सामना वाचवण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

ePaper

। गुरुवार ।

दि. 22 ऑक्टोबर 2026 ।



# 'सिंग इस किंग' स्टेटस पडले महाग!

## पिंपरी-चिंचवड शहर व परिसरात गुन्हेगारीचे सत्र सुरूच असून क्षुल्लक कारणांवरून जीवघेणे हल्ले

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**नातेवाईक दोन अल्पवयीन मुले खुनाच्या गुन्ह्यात बालसुधारगृहातून सुटल्याचे समाजमाध्यमावर ‘स्टेटस’ ठेवल्याने तिघांनी एका तरुणावर कोयत्याने वार केले. यामध्ये तरुण गंभीर जखमी झाला आहे. ही घटना मंगळवारी तळेगाव दाभाडे येथे घडली.**




जखमी झालेल्या तरुणाने तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तीन अल्पवयीन मुलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुन्या भांडणाच्या कारणावरून आठ जणांनी एका तरुणावर कोयत्याने वार करत ऑगस्टमध्ये त्याचा खून केला. या गुन्ह्यात फिर्यादीचे दोन अल्पवयीन नातेवाईक आरोपी होते. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन बालसुधारगृहात पाठवले. हे दोघे १९ ऑक्टोबर रोजी बालसुधारगृहातून बाहेर आले. त्याबाबत फिर्यादीने समाजमाध्यमावर ‘स्टेटस’ ठेवले होते. ते कपड्याच्या दुकानात काम करत असताना आरोपी मंगळवारी तिथे आले. त्यातील एकाने त्याला पॅन्ट खरेदी करायची असल्याचे सांगितले. फिर्यादी हे पॅन्ट दाखवण्यासाठी मागे वळाले असता तिघांनी मिळून त्यांच्यावर कोयत्याने वार केले. त्यात फिर्यादी हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तळेगाव दाभाडे पोलीस तपास करीत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुन्या भांडणाच्या कारणावरून ऑगस्ट महिन्यात आठ जणांनी एका तरुणावर कोयत्याने वार करून त्याचा खून केला होता. या प्रकरणात फिर्यादीचे दोन अल्पवयीन नातेवाईक आरोपी होते. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन बालसुधारगृहात पाठवले होते. हे दोघे १९ ऑक्टोबर रोजी बालसुधारगृहातून बाहेर आले. दोन्ही अल्पवयीन मुले बालसुधारगृहातून सुटल्याबाबत फिर्यादीने समाजमाध्यमावर स्टेटस ठेवले होते. याच गोष्टीचा राग मनात धरून आरोपींनी त्याच्यावर हल्ला केल्याची माहिती प्राथमिक तपासातून समोर आली आहे. फिर्यादी हा तळेगाव दाभाडे येथील एका कपड्याच्या दुकानात काम करत होता. मंगळवारी तिघे आरोपी त्या दुकानात आले. त्यापैकी एकाने पॅन्ट खरेदी करायची असल्याचे सांगितले. त्यामुळे फिर्यादी पॅन्ट दाखवण्यासाठी मागे वळाले. त्याचवेळी तिघांनी मिळून त्यांच्यावर कोयत्याने वार केले. अचानक झालेल्या या हल्ल्यात फिर्यादी गंभीर जखमी झाले. हल्ल्यानंतर जखमी तरुणाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली असून, सोशल मीडियावरील स्टेटसच्या कारणावरून झालेल्या हल्ल्याची चर्चा सुरू आहे.

### सोशल मीडियावरील स्टेटस ठरले हल्ल्याचे कारण?

खुनाच्या गुन्ह्यातील दोन अल्पवयीन नातेवाईक बालसुधारगृहातून सुटल्याबाबत स्टेटस ठेवल्याचा राग मनात धरून तिघांनी तरुणावर कोयत्याने हल्ला केल्याचा आरोप आहे. या घटनेत तरुण गंभीर जखमी झाला असून, तळेगाव दाभाडे पोलीस पुढील तपास करीत आहेत. याप्रकरणी जखमी तरुणाने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी तीन अल्पवयीन मुलांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तळेगाव दाभाडे पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत. हल्ल्यामागील नेमकी कारणे आणि घटनेशी संबंधित इतर बाबींचा तपास केला जात आहे.

## चऱ्होलीत गाडी धुण्यावरून सोसायटीत तुंबळ हाणामारी; परस्परविरोधी गुन्हे दाखल

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड शहरात पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले जात असतानाच, गाड्या धुण्यासाठी पाण्याचा वापर करण्यावरून चऱ्होली खुर्द येथील अभिमान श्री सोसायटीत दोन गटांमध्ये वाद झाल्याची घटना समोर आली आहे. दोन स्वतंत्र गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.**




नळाला पाइप लावून गाड्या धुण्यास विरोध केल्याने सुरू झालेला वाद मारहाणीपर्यंत पोहोचल्याचे आरोप करण्यात आले आहेत. या प्रकरणी आळंदी पोलीस ठाण्यात दोन्ही गटांकडून परस्परविरोधी तक्रारी दाखल झाल्या असून, दोन स्वतंत्र गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना २० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास सोसायटीच्या पार्किंगमध्ये घडली.

दरम्यान, दुसऱ्या तक्रारीनुसार, सचिन मच्छिंद्र कोठावडे हे सोसायटीच्या पार्किंगमध्ये बादलीतील पाण्याने आपली रिक्षा धूत असताना निलेश चव्हाण, राहुल शिंपळे, रविंद्र बदाणे, विवेक पवार आणि प्रांजय भालेराव यांनी त्यांना तसेच त्यांच्या पत्नी व मुलांना हाताने आणि बादलीने मारहाण करून शिवीगाळ केल्याचा आरोप आहे.

तसेच, तक्रार देण्यासाठी दुचाकीवरून पोलीस ठाण्याकडे निघालेल्या पत्नी आणि मुलाला अडवून सोसायटीचे मुख्य प्रवेशद्वार बंद केले, शिवीगाळ केली आणि धमकी देत रोखून धरल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. या तक्रारीवरून निलेश चव्हाण, राहुल शिंपळे, रविंद्र बदाणे, विवेक पवार आणि प्रांजय भालेराव यांच्याविरोधात स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दोन्ही बाजूंच्या तक्रारींची नोंद घेतली असून, संबंधित व्यक्तींविरोधात कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे. पार्किंगमध्ये वाहन धुण्यावरून झालेल्या या वादामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाल्याचे सांगण्यात येत आहे.

### पाणी वाचवण्याच्या मुद्द्यावरून वाद

पहिल्या तक्रारीनुसार, सोसायटीतील काही रहिवासी बोअरवेलच्या पाण्याच्या नळाला पाइप लावून गाड्या धूत होते. सध्या पाणीटंचाई सुरू असल्याने सोसायटीच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर नळाला पाइप लावून गाड्या धुण्याऐवजी बादलीत पाणी घेऊन कमीत कमी पाण्यात गाड्या धुण्याचे आवाहन करण्यात आले होते. असे असतानाही पाइप लावून गाड्या का धुत आहात, असा जाब विचारल्याने वाद वाढल्याचे तक्रारीत नमूद आहे. यावेळी शिवीगाळ करून हाताने तसेच बादलीने मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी राहुल माधवराव शिंपाळे (वय ३३) यांच्या तक्रारीवरून सचिन कोठावडे (वय ४६), विवेक कोठावडे (वय १८), कुणाल कोठावडे (वय २०), आशिष भालेराव (वय २८) आणि गणेश धातपांडे (वय २२) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शहरातील नैसर्गिक नाल्यांवर अनधिकृत बांधकामे

## पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या पूरस्थितीवर मात करण्यासाठी महापालिकेने मोठे पाऊल उचलले

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पावसाळ्यात शहरातील सखल भाग जलमय होण्यामागे नैसर्गिक नाल्यांवरील अतिक्रमणे प्रमुख कारण असल्याचे महापालिकेच्या सर्वेक्षणातून उघड झाले आहे. शहरातील ३६५ नैसर्गिक नाल्यांवर अनधिकृत बांधकामे आणि विविध अडथळे आढळून आले आहेत. त्यांपैकी ९३ नाले बुजविण्यात, तसेच वळविण्यात आले आहेत. तातडीने ६७ नाले अतिक्रमणमुक्त केले जाणार असून, निधी उपलब्ध झाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबवली जाणार असल्याचे प्रशासनाने सांगितले.**



महापालिकेच्या जलनिस्सारण व स्थापत्य विभागाने केलेल्या सर्वेक्षणात अनेक ठिकाणी नैसर्गिक नाले अरुंद पाइप टाकून बुजविण्यात आल्याचे, तसेच त्यावर रस्ते, वाहनतळ आणि अन्य बांधकामे झाल्याचे आढळले. त्यामुळे पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह थांबून गृहनिर्माण सोसायट्या, रस्ते आणि सखल भागात पाणी साचत असल्याचे स्पष्ट झाले आहे. क्षेत्रीय अधिकारी, कार्यकारी अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहायकांना आपल्या भागांतील नैसर्गिक नाले व ओढ्यांवरील अतिक्रमणाचे सर्वेक्षण करण्यास बजावण्यात आले होते. त्यानुसार पहिल्या टप्प्यात ३६५ पैकी ६७ नाल्यांवरील अतिक्रमण तातडीने हटवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. निधी उपलब्ध झाल्यानंतर निविदा काढून ते काम केले जाणार आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने उर्वरित नाल्यांवरील अतिक्रमण हटवले जाणार आहे. त्यानुसार, नियोजन करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

पहिल्या टप्प्यात कारवाई करण्यात येणाऱ्या ६७ नाल्यांची सद्य:स्थिती, अतिक्रमणांचे स्वरूप, 'बॉक्स कल्व्हर्ट'चा खर्च आणि तांत्रिक बाबींचा समावेश असलेला सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार आहे. मंजुरीनंतर निधी उपलब्ध करून निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल, असे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या जलनिस्सारण विभागाचे सह शहर अभियंता विनय ओहोळ यांनी सांगितले.

### मोठ्या गृहप्रकल्पात नाले गायब

गावांचे रूपांतर उपनगरात आणि उपनगरांचे रूपांतर आता स्मार्ट सिटीत झाले आहे. पवना, मुळा आणि इंद्रायणी या तीन नद्यांच्या तीरांवर शहर वसले आहे. त्यामुळे उपनगरातील पाणी नद्यांकडे वाहून जाते. नैसर्गिक प्रवाह निर्माण होऊन नाले तयार झाले.

शहरीकरणामध्ये यामधील अनेक नाले बांधकाम व्यवसायिकांनी गायब केले आहेत. त्या ठिकाणी टोलेजंग गृहप्रकल्प उभारण्यात आले आहेत. काही ठिकाणी नाले अरुंद करण्यात आले आहेत. काही ठिकाणी त्यावर बांधकामे कण्यात आली आहेत.

### नाल्यांसाठी 'डीपीआर'

या ६७ गंभीर नाल्यांसाठी महापालिकेच्या शहर अभियंता विभागाकडून सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात आला आहे. सध्याचे अरुंद पाइप काढून त्याऐवजी अधिक क्षमतेचे 'बॉक्स कल्व्हर्ट' उभारण्याचा प्रस्ताव आहे. आयुक्तांची मंजुरी, निधी उपलब्धता आणि निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

# उन्नती सोशल फाउंडेशनचा दांडिया महोत्सव जल्लोषात संपन्न..!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**नवरात्रोत्सवाच्या उत्साहपूर्ण वातावरणात उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने आयोजित दांडिया महोत्सव व नृत्य स्पर्धा यंदाही मोठ्या जल्लोषात पार पडल्या. पिंपळे सौदागर येथील राजमाता जिजाऊ उद्यानाच्या परिसरात शनिवार, दि.१७ ते सोमवार, दि.१९ ऑक्टोबरदरम्यान आयोजित या महोत्सवात आबालवृद्धांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.**



दांडियाच्या तालावर थिरकणारे नागरिक, विविध नृत्य स्पर्धांमधील कलाकारांचा उत्साह आणि उपस्थितांचा भरभरून प्रतिसाद यामुळे संपूर्ण परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले. सामाजिक एकोपा, सांस्कृतिक परंपरांचे जतन आणि नागरिकांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने आयोजित या महोत्सवाने पिंपळे सौदागर परिसरात विशेष रंगत आणली.

या महोत्सवाचे उद्घाटन मा. आमदार अश्विनी जगताप आणि पिंपरी-चिंचवड भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेविका अनिता काटे, सामाजिक कार्यकर्ते व गोसेवक ह.भ.प. विजय शेठ जगताप, पी.के. इंटरनॅशनल स्कूलचे संचालक जगन्नाथअप्पा काटे, सामाजिक कार्यकर्ते संदेश काटे, सपना काटे, उद्योजक राजू भिसे, ऑल सिनिअर सिटिझन्स असोसिएशनचे सचिव सखाराम ढाकणे, आनंद हास्ययोग क्लबचे अध्यक्ष दिगंबर राजगुरे, लिनियर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष अशोक वारकर आणि उन्नती सखी मंचच्या सदस्या यांची प्रमुख उपस्थिती होती. उन्नती सोशल फाउंडेशनचे संस्थापक श्री. संजय भिसे तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विधी समितीच्या सदस्या तथा नगरसेविका डॉ. कुंदाताई संजय भिसे यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.

उद्घाटनप्रसंगी आमदार अश्विनी जगताप, भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे आणि नगरसेविका अनिता काटे यांनी मनोगत व्यक्त करून उन्नती सोशल फाउंडेशनच्या दांडिया महोत्सवाला शुभेच्छा दिल्या. सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांना एकत्र आणण्याचे कार्य कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले.

सामाजिक कार्यकर्ते व सेवेकरी ह.भ.प. विजय शेठ जगताप म्हणाले, "समाजसेवा ही केवळ गरजू व्यक्तींना मदत करण्यापुरती मर्यादित नसून समाजातील प्रत्येक घटकाला एकत्र आणणे, परस्परांमध्ये आपुलकी निर्माण करणे आणि आनंदाचे क्षण सर्वांसोबत साजरे करणे हेदेखील समाजकार्याचे महत्त्वाचे अंग आहे. उन्नती सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रमांसोबतच अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, ही आनंदाची बाब आहे. दांडिया महोत्सवाला आबालवृद्धांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद समाजातील एकात्मतेचे प्रतीक आहे. भविष्यातही अशा उपक्रमांच्या माध्यमातून समाजाची सेवा आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन घडत राहो, अशा शुभेच्छा मी व्यक्त करतो."

तीन दिवस चाललेल्या या महोत्सवात नृत्य स्पर्धांच्या माध्यमातून सहभागी कलाकारांना आपले कलागुण सादर करण्याची संधी मिळाली. नागरिक, महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या सहभागामुळे महोत्सवाला विशेष रंगत आली.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046